# मुंडू (लुंगीसारखे वस्त्र) यापेक्षा धोतर श्रेष्ठ असण्यामागील शास्त्र

## मनोगत

‘दक्षिण भारतियांना ‘मुंडू (लुंगीसारखे वस्त्र)’ या त्यांच्या पारंपरिक वेशभूषेचा विशेष अभिमान आहे. खरे पहाता ऋषिमुनींच्या काळापासून चालत आलेली हिंदूंची वेशभूषा ‘धोतर’ ही हिंदूंची प्राचीन परंपरा असून ते हिंदु संस्कृतीचे एक अविभाज्य अंगच आहे. पाश्चात्त्यांचे अंधानुकरण, धर्मशिक्षणाचा अभाव आदी कारणांमुळे धोतर नेसण्याची हिंदूंची प्राचीन संस्कृती हळूहळू ऱ्हास पावत चालली असून मुंडू नेसण्याची प्रथा हिंदूंनी स्वीकारली आहे. आजच्या ‘फॅशन’च्या जगात ‘धोतर नेसणे’, हे मागासलेपणाचे लक्षणही मानले जाते; कारण ‘धोतर हे केवळ शेतकरी आणि पुरोहित यांनी नेसायचे वस्त्र आहे’, अशी लोकांची भ्रामक कल्पना झालेली आहे. बऱ्याच हिंदूंना धोतर नेसणे कठीण वाटते किंवा ते नेसायचा कंटाळाही येतो. एखादे अनुष्ठान किंवा धार्मिक विधी करतांना अथवा देवळात जातांनाही बरेच हिंदू धोतर नेसायला सिद्ध नसतात.

‘मुंडू नेसणे’, हे असात्त्विक आहे. मुंडू नेसलेल्या व्यक्तीकडे आसुरी शक्ती आकृष्ट होतात अन् त्यामुळे व्यक्तीला शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक त्रासांना सामोरे जावे लागते. मुंडू नेसण्यास धर्मशास्त्राचीही अनुमती नाही. याउलट ‘धोतर परिधान करणे’, हे सात्त्विक असून ते नेसल्याने ईश्वरी चैतन्य ग्रहण होते आणि धर्मपालनही होते. प्रस्तुत ग्रंथात या सर्वांमागील अध्यात्मशास्त्र विशद केले आहे. ‘सध्या संन्यासी वा शक्तीमार्गी नेसत असलेले ‘लुंगीसारखे भगवे वस्त्र’ हेही सध्याच्या काळासाठी अयोग्य कसे आहे’, यामागील अध्यात्मशास्त्रही ग्रंथात सांगितले आहे.

या ग्रंथाचे अद्वितीयत्व म्हणजे, ग्रंथात ‘आतापर्यंत पृथ्वीवर कोठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मशास्त्रीय ज्ञान’ अंतर्भूत आहे. सध्याच्या विज्ञानयुगातील पिढीला प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक चाचणीद्वारे, म्हणजे यंत्राने सिद्ध करून दाखवली, तरच ती खरी वाटते. त्यामुळे ‘मुंडू असात्त्विक असून धोतर सात्त्विक आहे’, हे सिद्ध करणाऱ्या ‘महर्षि अध्यात्म

विश्वविद्यालया'ने केलेल्या वैज्ञानिक चाचण्याही ग्रंथात दिल्या आहेत. हाही या ग्रंथाचा एक आगळावेगळा पैलू आहे.

'हा ग्रंथ वाचून 'धोतर नेसणे' या हिंदु संस्कृतीतील वेशभूषेविषयीच्या एका महत्त्वाच्या आचाराविषयी वाचकांचा अभिमान वाढो, तसेच ईश्वरी चैतन्य प्राप्त करण्यासाठी त्यांनी धोतर नेसण्यास आरंभ करो', ही श्री गुरुचरणी प्रार्थना !' – **संकलक**

## ग्रंथाचा उद्देश 'कोणाच्याही धर्मभावना दुखावणे', हा नाही!

दक्षिण भारतियांना 'मुंडू (लुंगीसारखे वस्त्र)' या त्यांच्या पारंपरिक वेशभूषेचा विशेष अभिमान आहे. बहुतेक दक्षिण भारतीय धार्मिक कार्यांच्या प्रसंगीच नव्हे, तर इतर वेळीही मुंडूच नेसतात. त्यांच्या दृष्टीने मुंडू हे धार्मिकतेचे एक लक्षण आहे. खरे पहाता मुंडू ही वेशभूषा असात्त्विक असून ती हिंदु धर्मानुसार नाही. याउलट 'धोतर' ही ऋषिमुनींच्या काळापासून चालत आलेली हिंदूंची वेशभूषा सात्त्विक असून ती हिंदु धर्मानुसारही आहे. इतकेच नव्हे, तर सध्या संन्यासी वा शक्तीमार्गी नेसत असलेले 'लुंगीसारखे भगवे वस्त्र' हेही सध्याच्या काळासाठी अयोग्यच आहे. प्रस्तुत ग्रंथात या सर्वांमागील अध्यात्मशास्त्र स्पष्ट केले आहे. हे लिखाण कोणाच्याही धर्मभावना दुखावण्याच्या हेतूने केलेले नसून 'सर्वांनीच अध्यात्मशास्त्र जाणून घेऊन ईश्वरी चैतन्य प्राप्त करण्यासाठी योग्य वेशभूषा करावी आणि हिंदु धर्माभिमानी व्हावे', या हेतूने केले आहे.


## 'आहारा'संदर्भात आध्यात्मिक दृष्टीकोन देणारा सनातनचा ग्रंथ !



**सात्त्विक आहाराचे महत्त्व**

- शाकाहार म्हणजे धर्मपालन असण्याचे कारण
- शाकाहार करण्यावरील टीकेचे खंडण

# अनुक्रमणिका

[काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.]


| | | |
|---|---|---|
| १. | **मुंडू (मुंड, लुंगीसारखे वस्त्र)** | २२ |
| | * मुंडू नेसणे, हे हिंदूंच्या धर्मग्रंथांनुसारही अयोग्यच असणे | २३ |
| | * आसुरी शक्तींनी मुंडूची रूढी निर्माण करण्यामागील सूक्ष्म प्रक्रिया | २४ |
| | * मुंडूची स्पंदनक्षमता अन् मुंडूमुळे दुष्परिणाम होणारी देहातील केंद्रे | २५ |
| | * मुंडू नेसण्याचे दुष्परिणाम | २५ |
| | * आसुरी शक्तींच्या आक्रमणांमुळे अनेक संतांनी मुंडू नेसण्याची कुप्रथा आचरणे | ३३ |
| | * पू. (सौ.) वाले यांना मुंडूविषयी जाणवलेले सूक्ष्मातील परिणाम | ३४ |
| २. | **धोतर** | ३६ |
| | * धोतर नेसणे, हे हिंदु धर्मानुसार असणे | ३६ |
| | * पाश्चात्त्यांचे अंधानुकरण, धर्मशिक्षणाचा अभाव आदींमुळे धोतर नेसण्याची हिंदूंची प्राचीन संस्कृती हळूहळू ऱ्हास पावणे | ३७ |
| | * धोतराची स्पंदनक्षमता आणि धोतर नेसल्यामुळे चांगला परिणाम होणारी देहातील केंद्रे | ३९ |
| | * धोतर नेसण्याचे महत्त्व | ३९ |
| | * धोतर नेसल्याने होणारे काही लाभ | ३९ |
| |   * पचनक्रिया चांगली होण्यास साहाय्य होणे | ३९ |
| |   * 'अंतर्गळ (हर्निया)' हा विकार टाळण्यास साहाय्य होणे | ४० |
| |   * आरोग्य सुधारण्यास साहाय्य होणे | ४० |
| |   * वाईट शक्तींचा कुंडलिनीचक्रांवरील परिणाम न्यून होऊन मनुष्याला साधनेसाठी अनुकूलता प्राप्त होणे | ४० |

मुंडू (लुंगीसारखे वस्त्र) यापेक्षा धोतर श्रेष्ठ असण्यामागील शास्त्र २१

* वाईट शक्तींना कुंडलिनीचक्रांच्या ठिकाणी स्थाने निर्माण करणे अवघड जाणे ४१

* धोतर नेसण्याची योग्य पद्धत ४४

* पायजम्यासारखे घालता येणारे तयार स्वरूपात मिळणारे धोतर (धोती-पायजमा) वापरणे अयोग्य असणे ४५

**३. सध्या संन्यासी वा शक्तीमार्गी नेसत असलेले लुंगीसारखे भगवे वस्त्र** ४६

**४. धोतर आणि सध्या संन्यासी वा शक्तीमार्गी नेसत असलेले लुंगीसारखे भगवे वस्त्र** ५०

**५. धोतर आणि मुंडू** ६२

**६. 'मुंडू असात्त्विक असून धोतर सात्त्विक आहे', हे स्पष्ट करणाऱ्या 'महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया'ने केलेल्या वैज्ञानिक चाचण्या** ७१

६ अ. 'मुंडू असात्त्विक असून धोतर सात्त्विक आहे', हे स्पष्ट करणारी 'पिप (पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी)' या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेली वैज्ञानिक चाचणी ७२

६ आ. 'मुंडू नेसणे असात्त्विक असून धोतर नेसणे सात्त्विक आहे', हे स्पष्ट करणारी 'यू.टी.एस्. (युनिव्हर्सल थर्मो स्कॅनर)' या उपकरणाद्वारे केलेली वैज्ञानिक चाचणी ७५

**७. महान हिंदु धर्म, हिंदु संस्कृती आणि हिंदु राष्ट्र यांची उज्ज्वल पताका पुनश्च फडकवण्यासाठी समस्त हिंदूंना आवाहन !** ७७

**८. धोतर नेसणे काही कारणास्तव जमणारच नसेल, तर निदान पायजमा तरी वापरावा; पण 'पँट' वापरू नये !** ७८

**९. 'धोतर' या वेशभूषेच्या जोडीलाच साधना करणेही तेवढेच आवश्यक !** ८०

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ८१

**卐 सनातनच्या ग्रंथनिर्मिती-कार्यात सहभागी व्हा !** ८५